माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र.बीएम-७६७/२०२४**

**अपिलार्थी श्री. मंगल एम काटवटे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-३ (पश्चिम)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन,
कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, रुम नं.५३७, ४ था मजला,
गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

| द्वितीय अपील आदेश दिनांक | तक्रार दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याकडून मागविण्यात आलेल्या अहवाल पत्र दिनांक | जन माहिती अधिकाऱ्यांचा अहवाल दिनांक |
|---|---|---|---|
| - | ११.११.२०२४ | ०६.०८.२०२६ | २०.०८.२०२६ |

तक्रारकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये आयोगाकडे दि. ११.११.२०२४ तक्रार दाखल केली आहे.

२. सदर तक्रार अर्जात त्यांनी असा उल्लेख केला आहे की, " मालाड पश्चिम नाहर नगर रोड, वामन पै चौक येथे सौदर्यीकरणची कामे सौंदयीकरण निधी वापरुन आमदार असलम शेख यांच्यावतीने झाले आहे. बील पास झाले त्याबाबत दि.०९.०२.२०२४ रोजी अर्ज देऊन माहिती मागितली आहे त्याचे उत्तर दि.०४.०३.२०२४ रोजी मिळाले. दिशाभूल करणारे मिळाल्यावर दि.१९.०३.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल करण्यास आली. अपीलाची सुनावणी दि.०५.०४.२०२४ रोजी मा. कार्यकारी अभियंता, पश्चिम यांच्या दालनात झाली त्याच्यामध्ये अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती १५ कार्यालयीन दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी परंतु आजपर्यंत कोणती ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात आले नाही याच्यामध्ये माहिती अधिकाराचे उल्लंघन झाले. याबाबत दि.१५.०५.२०२४ रोजी मार्गदर्शन अर्ज देण्यात आले तरी ही माहिती देण्यात आली नाही म्हणजे येथे हम करे सो कायदा सुरु आहे. आपणांस विनंती आहे की, माहिती न देणारे मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे उप अभियंता / जन माहिती अधिकारी-३ यांच्यावर कलम १८ (१) अन्वये कारवाई करुन माहिती देण्याचे आदेश देण्यात यावा."

३. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता-३ यांच्याकडून दि.०६.०८.२०२६ च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-३ (प) यांनी आयोगास दि.२०.०८.२०२६ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. त्याद्वारे त्यांनी खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

- अर्जदार श्रीमती मंगल सु. काटवटे यांनी दिनांक ०९.०२.२०२४ रोजी माहिती अधिकार अधिनियम अन्वये अर्ज सादर करुन मालाड पश्चिम, नाहर नगर रोड, वामन पई चौक येथे सौंदर्याकरण ची कामे सौंदर्याकरण निधी कामाबाबतची माहिती मिळणेची मागणी केलेली होती.

- सदर माहिती बाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र. ३३३१, दिनांक २७.०२.२०२४ नुसार अर्जदारास माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत आपण संदर्भाधिन माहितीच्या अर्जान्वये १६२-मालाड (प) विधानसभा मतदार संघाची (मालाड पश्चिम, नाहर नगर रोड, वामन पई चौक येथे सौंदर्याकरण ची कामे सौंदर्याकरण निधी) माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपण मागितलेली माहिती या कार्यालयामध्ये डिजीटल स्वरुपामध्ये (Scan) उपलब्ध आहे. करिता, कार्यालयीन दिवशी दुपारी ०३.०० ते ०५.०० च्या दरम्यान येऊन उपस्थित रहावे व निम्नस्वाक्षरीकार अथवा अधिनस्त सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता यांची भेट घ्यावी. उपलब्ध माहिती आपणांस हवी असेल, त्याकरीता आपण स्वखर्चाने सी.डी. किंवा पेन ड्राईव्ह आणल्यास सदर माहिती आपणास उपलब्ध करून देण्यात येईल असे कळविण्यात आले होते.
- अर्जदाराने या कार्यालयात येवून या उपविभागास भेट न देता दि.१९.०३.२०२४ रोजी तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पश्चिम विभाग, मुं. झो.सु. मंडळ यांचाकडे प्रथम अपील दाखल केले.
- तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पश्चिम विभाग, मुं. झो.सु. मंडळ यांनी दिनांक ०४.०४.२०२४ रोजी प्रथम अपीलावर सुनावणी घेतली व आदेश जारी केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यांस उपलब्ध असलेली माहिती योग्य ते शुल्क आकारुन १५ दिवसात उपलब्ध करून दयावी. असे आदेश दिले.
- तदनंतर दि. ०५.०६.२०२४ रोजी अपिलकर्त्याने या कार्यालयात भेट दिल्यानंतर त्यांना हवी असलेली माहिती ही ई-मेल स्वरुपात मिळाली असे लेखी स्वरुपात लिहून दिले.
- तथापी अर्जदार यांनी माहिती मिळाली असताना देखील दि.११.११.२०२४ रोजी मा. राज्य माहिती आयोग यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तरी मा. आयोगास विनंती करण्यात येते की, तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी संबंधित अर्जदारास आवश्यक माहिती उपलब्ध करून दिलेली असल्याने निम्नस्वाक्षरीकार यांचा वरीलप्रमाणे अभिप्राय मान्य करुन अर्ज निकाली काढावा हि विनंती.

४. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास अभिलेखावरील उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. त्यामूळे सदर प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १८(२) अन्वये अधिक/ सखोल चौकशी करण्याची आवश्यकता नाही, असा निष्कर्ष काढून आयोग पुढील आदेश देत आहे :

**आदेश**

**उपरोक्त विवेचनासह तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

प्रदीप व्यास
31-8-2026

**मुंबई**
**दिनांक : ३१.०८.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**